INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

July-August-September-2018

Vol. 5 Issue 3

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Munaf Shaikh, Jalgaon (Urdu)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

## हिंदी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 28 | बौद्ध एवं शैवो की दार्शनिक समन्वयाभिव्यक्ती : नाथ साहित्य | डॉ. शशिकांत सोनवणे | 152 |
| 29 | आचार्य नरेन्द्र का किसान एवं मजदूर आंदोलनो में योगदान | डॉ.राजीव रतन | 163 |
| 30 | नाटककार जगदीशचंद्र माथुर ('कोणार्क नाटक के विशेष संदर्भ में) | डॉ. सुचिता गायकवाड | 169 |
| 31 | हिंदी कविता और वर्तमान संदर्भ में रस सिद्धांत | डॉ.ज्ञानेश्वर महाजन | 176 |
| 32 | आदिवासी क्षेत्रो में महिलाओं की स्थिती | प्रा.आर.एन.वाकळे | 180 |
| 33 | विद्यानिवास मिश्र कें निवंधो में पर्यावरण | डॉ. अनंत शिंगाडे | 183 |
| 34 | डॉ. सुशीला टाकभौरे के काव्य में अभिव्यक्त भारतीय समाज | डॉ. उद्धव भंडारे | 186 |
| 35 | 'मोहें रंग दो लाल' में विषयों की विविधता | प्रा. अंजीता वेलीप | 194 |
| 36 | केदारनाथ अग्रवाल की कहानी 'समाज की भूल में नारी जीवन | प्रा. संतोष नागरे | 201 |
| 37 | संकिर्ण मानसिकता की प्रस्तुति : ' हे गंगा तुम बहती हो क्युं...?' | डॉ. धीरज व्हत्ते | 204 |
| 38 | हिंदी दलित कहानियों में अभिव्यक्त भारतीय समाज | डॉ. उद्धव भंडारे | 208 |


## मराठी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 39 | जैन धर्मातील दीक्षा | प्रा. बाळासाहेब गणपाटील | 214 |
| 40 | हिंदू धर्मातील स्त्रियांचे सामाजिक स्थान व मानवी हक्क | डॉ. वंदना चौधरी | 218 |
| 41 | लोकसाहित्यातील लोकजीवन व लोकसमजुती | डॉ. बाबासाहेब शेंडगे | 220 |
| 42 | लोकनाट्य जांभूळ आख्यान | आश्विनी माने | 224 |
| 43 | कोकणातील लोकनाट्य 'नमन-खेळे'-एक चिकित्सा | दुर्गेश मजिक | 230 |
| 44 | साक्री तालुक्यातील अहिराणी ओवीगीतातील स्त्री-जीवन | डॉ.प्रकाश साळुंके | 237 |
| 45 | 'कणसरी डुलं' मधील आदिवासींचे समाज वास्तव | डॉ. अंजली मस्करेन्हस | 243 |
| 46 | चक्रधर स्वामींची साधकासाठी आचारसंहिता | डॉ. प्रवीण कारंजकर | 247 |
| 47 | संत चोखामेळा आणि त्यांचा परिवार | डॉ.काशिनाथ ब-हाटे | 250 |
| 48 | संत कवयित्रींच्या काव्यातील मुक्त आविष्कार | डॉ. शीला गाढे | 257 |
| 49 | विद्याधर गोखले यांची संगीत नाटके | प्रा. विद्या बावणे | 260 |
| 50 | १९६० पूर्वीच्या मराठी नाटकातील स्त्री | डॉ. अशोक लिंबेकर | 263 |
| 51 | महापुरुषांच्या कृतीशील जलनीतीची वर्तमानकालीन उपयुक्तता | डॉ. दादाराव गुंडरे | 271 |
| 52 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्यता निर्मुलन | डॉ.उमाकांत वानखेडे | 275 |
| 53 | राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य | डॉ. लता आंदे | 279 |
| 54 | महात्मा गांधींच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. अनिल गर्जे | 285 |
| 55 | दलित कविता आणि सद्यस्थिती : एक आढावा | प्रा.सिद्धार्थ इंगोले | 289 |
| 56 | दलित कविता आणि सद्यस्थिती | डॉ. बाळासाहेब लिहीणार | 292 |
| 57 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील गावगाडा | डॉ. सहदेव चव्हाण | 295 |
| 58 | ग्रामीण कादंबरीतील स्त्री संघर्ष | डॉ. संतोष देशमुख | 299 |
| 59 | मराठी साहित्यातील स्त्रियांचे कथालेखन | डॉ.सुवर्णा गाडगे | 302 |
| 60 | राष्ट्रसंतांच्या लेखनातील राष्ट्रीय विचार | डॉ. प्रवीण कारंजकर | 307 |
| 61 | 'पोटमारा' कादंबरीतून उच्च शिक्षित तरुणांच्या समस्या | डॉ.किशोर पाठक | 311 |




Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal July-August-Sept. 2018 | Vol. 5, Issue 3

# महापुरुषांच्या कृतीशील जलनीतीची वर्तमानकालीन उपयुक्तता

**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे**
मराठी विभाग प्रमुख,
शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब
ता. कळंब, जि. उस्मानाबाद - ४१३५०७

मानवाच्या मुलभूत गरजा म्हणून अन्न, वस्त्र, निवारा यांना विशेष महत्त्व आहे. यामध्येच पाणी या एका अविभाज्य घटकाचा समावेश होतो. म्हणूनच पाण्याला आपण जीवन मानतो. पाणी ही मानवाची, अवघ्या सजीव सृष्टीची मूलभूत गरज आहे. विकासाच्या गाड्याचे इंधन आहे. माणसाच्या विकासाचा ध्यास आणि श्वास म्हणजे पाणी. हे आपण मान्यच केले पाहिजे. पाणी ही नैसर्गिक साधनसंपत्ती असून या पाण्यावर सर्व प्राणीमात्रांचा अधिकार आहे. आज पिण्यासाठी पाणी तसेच शेतकऱ्यांना पाणी व वीज या मुलभूत सुविधा देण्यात उणिवा अर्थात नियोजन नसल्याने शेतकऱ्यांची स्थिती बिकट झालेली दिसते. मानवी जीवन नेहमीच अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. ज्यामध्ये नैसर्गिक व मानवनिर्मित अशा दोन्ही बाजूंनी येणाऱ्या संकटांचा समावेश होतो. प्रत्येक गाव, शहर, राज्य व देशासमोर बदलत्या पर्यावरणात दुष्काळ, महागाई, बेकारी, गुन्हेगारी, दहशतवाद, भ्रष्टाचार, लोकसंख्या वाढ, स्त्रीभ्रुण हत्या, प्रदुषण तसेच अन्नधान्य टंचाई व पाणी टंचाई यांसारख्या समस्या उभ्या ठाकलेल्या दिसतात. प्रत्येक समस्येच्या मुळाशी जाऊन त्यापासून होणाऱ्या नुकसानीला टाळण्यासाठी सर्वांगाने विचार कृतीतून देण्याचे काम त्या-त्या कालखंडात अनेक घटकांनी केले. ज्यामध्ये पाणीटंचाईच्या संदर्भात या देशात अनेक राज्ये, समाजसुधारक व राष्ट्रपुरूषांनी पाण्यासंबंधी समग्र व व्यापक विचारांनी केलेले काम लक्षात घ्यायला हवे. तथागत भगवान बुद्ध यांच्यापासून ते छत्रपती शिवराय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महापुरूषांनी दाखविलेल्या मार्गाचा अवलंब करणे सध्या अधिक महत्त्वपूर्ण वाटते. हाच जलनियोजन, जलव्यवस्थापनाचा विचार या लेखाच्या निमित्ताने समोर आणणे हा मुख्य उद्देश आहे.

RESEARCHJOURNEY

भूजलव्यवस्था ही एक सामाजिक साधनसंपत्ती आहे. तिच्या नैसर्गिक मर्यादा ध्यानात घेऊन भूजल नियोजन करणे अगत्याचे ठरते. 'नेमेचि येतो मग पावसाळा' या ओळीप्रमाणे समस्या येत राहतात व त्यावर काही उपाय योजनाही केल्या जातात. पण त्या काही वेळा अयशस्वी ठरलेल्या दिसतात. दुर्दैवाने जलदांडगे निर्माण होतात. पाणीदारी पोसली जाताना निदर्शनास येते. तेंव्हा जर शासनाचा निधी जिरविण्याच्या प्रवृत्तीला थारा दिला नाही तरच पाणी मुरविणे शक्य होईल. त्यासाठी महापुरूषांनी सांगीतलेल्या जलनितीचा, कृषीधोरणाचा अभ्यास करणे व कार्यवाही करणे आजच्या घडीला महत्त्वपूर्ण ठरते.

जसे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य उभारणीच्या कार्यास पर्यावरण व जलसंवर्धनाचे अधिष्ठान लाभलेले होते. कारण कृषीप्रधान देशातील शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून व बहुसंख्य जनतेच्या कल्याणासाठी स्वराज्य आहे ही जाणीव ठेवून छत्रपती शिवरायांनी जलनितीचे धोरण स्वीकारले होते. हे तत्त्वज्ञान स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या ७१ वर्षानंतरही स्वीकारावे लागते. स्वतंत्र, सार्वभौम व लोककल्याणकारी स्वराज्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचे सुद्धा पाठबळ असणे खूप गरजेचे असते. असा महत्त्वपूर्ण विचार करून शिवरायांनी आपल्या स्वराज्यात वनसंपदा, जलसंवर्धन व जलव्यवस्थापनावर मोठा भर दिला. आजच्यासारखी दुष्काळी परिस्थिती, त्याची तीव्रता वाट्यास आलेली दिसते. इ.स. १६३० तसेच १६५० मध्ये दुष्काळ पडल्याच्या नोंदी आढळतात. दुष्काळ व निसर्गाचा लहरीपणा लक्षात घेवून जलनितीचे धोरण राबवले. 'गडावरचे पाणी बहुत जतन राखावे' अशी आज्ञा करून पाणी बचतीचा संदेश दिला. दुष्काळावर मात करण्यासाठी गडाखालील वस्त्यात विहिरी, तलाव, पानवठे खोदून



Scanned with OKEN Scanner

घेतले. गडावर पाणी साठवण्यासाठी तलावाचा, विहिरीचा व पाण्याच्या टाकीचा शास्त्रीय पद्धतीने वापर केला. शिवाय पाणी हे काटकसरीने वापरले जावे यासाठी कडक नियमावली होती. गडावर सांडपाण्याचेही अतिशय योग्य व्यवस्थापन केले होते. प्रा. दिनेश कचकुरे यांनी शिवरायांच्या जलनितीचा वेध घेताना, 'सांडपाण्याच्या माध्यमातून भाजीपाला पिकवणे अर्थात परसबाग ही संकल्पना ३५० वर्षापूर्वी शिवरायांनी जनव्यवहारात आणली होती.'(१) असे म्हटलेले दिसून येते.

पाण्याची भरभराट, उपलब्धता असतांना देखील जलसिंचनाचे महत्त्व ध्यानात घेवून किल्ले रायगडावर जलसंधारणाची कामे मावळ्यांच्या मदतीने केली. त्यामध्ये अतिशय उंचीवर असून देखील तेथे कडक उन्हाळ्यातही सतत पाणी मिळत गेले. कधीच पाण्याची कमतरता जाणवली नाही.

शिवरायांच्या जलनितीची अनेक उदाहरणे सांगता येतील. रायगड किल्ला हा सह्याद्री पर्वतरांगेच्या जवळ आहे. जेथे पावसाळ्यात मुबलक पाऊस पडतो. तर उन्हाळ्यात पिण्यास पाणी मिळत नाही. हे पाणी अडवून धरले तर उन्हाळ्यात वापरता येईल म्हणून तेथे ११ तलाव व सुमारे ८४ पाण्याच्या टाक्या बांधून 'पाणी आडवा पाणी जिरवा' हे दूरदृष्टीच्या जलनितीचे धोरण स्विकारले. आजही शिवकालीन जलनितीचे अवशेष पहावयास मिळतात. ही बाब खुपच महत्त्वाची वाटते. पर्यावरण, जलसंवर्धन या संबंधीत शिवरायांचा दृष्टीकोन रामचंद्रपंत अमात्यांनी लिहिलेल्या 'आज्ञापत्रात' स्पष्ट दिसतो. 'तैसेच गडावरी आधी उदक पाहून किल्ला बांधावा, पाणी नाही आणि ते स्थळ तो अवश्यक, बांधणे प्राप्त जाले तरी आधी खडक फोडून तळीं टाकीं पर्जन्य काल पर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल यैसी मजबुत बांधावी. गडावरी झराही आहे जैसे तैसे पाणीही पुरते. म्हणोन तितक्यांचवर निश्चिंती न मानितां उद्योग करावा. किनिमित्त की जुझामध्ये भांडियाचे आवाजाखाले झरे स्वल्प होतात आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो. तेंव्हा संकट पडने यांकरिता तैसे जागां जकेरियाचे पाणी म्हणोन दोन च्यार तळीं टाकीं बांधून ठेऊन त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे. गडाचे पाणी बहूत जतन करावे.'(२) यावरून छत्रपती शिवराय हे पर्यावरण, जलसंवर्धनाचे पुरस्कर्ते तसेच त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या पर्यावरणविषयक, भौगोलिक दृष्ट्या नाविण्यपूर्ण दूरदृष्टीमुळेच ते सर्वोच्च ठरतात. प्रा. सतिश कुमदाळे यांनी 'शिवनीती पर्यावरणाची' या लेखात मांडलेले मत महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात, "वसुंधरा ही आपल्याला वारसाहक्काने मिळालेली नसून ती आपल्या पुढच्या पिढीकडून आपण उसणवार घेतलेली आहे. म्हणूनच आपल्यासाठी आणि पुढच्या पिढीसाठी ती ठेव सांभाळायची आहे. हे शाश्वत विकासाचे सूत्र शिवनितीत सापडते."(३) शिवनीतीत संकटे येण्यापूर्वीच ती निराकरणाच्या उपाय योजनेचे तंत्र सापडते. हे वास्तव आहे.

RESEARCHJOURNEY

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी तत्कालीन कालखंडात जलनीती ठरवून काही सुधारणा केल्याचे दिसते. अनेक घाट, विहिरी, कुंड निर्माण केले. सासरे मल्हारराव होळकर राज्यकारभाराची जबाबदारी सून अहिल्यादेवीवर सोपवून मोहिमेवर जात. एकदा अशाच परिस्थितीत त्यांनी शेतसाठी, पाटासाठी अधिक खर्च केला. ही अधिक खर्च केल्याची विचारणा मुनीम गंगोबा तात्याच्या चहाडीवरून मल्हारराव होळकरांनी अहिल्यादेवीकडे केली. तेंव्हा त्यांनी जे उत्तर दिले त्या उत्तरातच शेती व पाण्याबद्दलचे धोरण स्पष्ट होते. आधुनिक सिंचन व्यवस्थापनाची जननी ठरलेली फड पद्धत याच वेळी आली. याचा विस्तार केला तो अहिल्यादेवींनी. लोकसहभागातून ही पद्धत त्यांनी यशस्वी करून दाखवली. अडीचशे वर्षापूर्वी त्यांनी वापरलेल्या जलनीतीने एक आदर्श उभा केला. हाच आदर्श समोर ठेवून शासनाने लोकसहभागातून जलयुक्त शिवार, शेततळी तसेच पारंपारिक जलस्त्रोतांचे पुनरूज्जीवन करण्याची मोहिम सध्या हाती घेतलेली दिसून येते.

शेतकऱ्यांसाठी आवश्यक असणारे पाणी व शेती यासाठी महात्मा फुले आयुष्यभर लढले. त्यांनी पाणी विषयी जे विचार मांडले त्यास उत्तम कांबळे जलनीती किंवा फुल्यांची भूनीती असे म्हणतात. पावसाअभावी पडणाऱ्या दुष्काळाच्या झळा शेतकऱ्यास अधिक बसतात. अगदी आत्महत्येपर्यंत तो जातो. अशा वेळी महात्मा फुलेंनी पावसाचे



Scanned with OKEN Scanner

पाणी योग्य तऱ्हेने वाचविल्यास, जमिनीत मुरविल्यास त्याचा होणारा अपव्यय टाळल्यास निश्चित दुष्काळाशी दोन हात करता येतात. म्हणूनच महात्मा फुलेंनी पाणी अडवण्यावर, त्याचा योग्य वापर करण्यावर भर दिला. तसेच उपाय शोधून काढले. त्यासाठी कालव्याची कल्पना मांडली. त्यांनी 'दुष्काळापासून शेतकऱ्यांना वाचवायचे असेल कॅनॉलशिवाय पर्याय नाही.'(४) असे ठाम मत मांडलेले दिसते. ही कॅनॉलची कल्पना समाज व शासनासमोर निराळ्या पद्धतीने त्यांनी मांडली. गावोगावी तसेच डोंगर खोऱ्यात, टेकड्यात तलाव, बंधारे बांधण्याचा आग्रह धरला. फुलेंनी पावसाच्या पाण्याचा विचार तर केलाच पण त्याचबरोबर जमिनीच्या पोटातील पाण्याचाही विचार केला. पाण्याच्या संवर्धनाबरोबर त्याच्या वापराचे महत्त्व विषद केले. त्या काळी महात्मा फुलेंनी 'पाणी हेच एखाद्याचे धन व ऐश्वर्य आहे'(५) अशा शब्दातून पाण्याचे महत्त्व प्रकट केले. मोठे प्रयोग व प्रबोधन केले. सरकारने पाण्यासाठी काही तरी केले पाहिजे ही फुलेंची तक्रार होती. सरकारने सेवकाची भूमिका बजावावी असे सांगितले. त्या काळात फुलेंनी मांडलेली तोटी पद्धत ही अनोखी कल्पना लक्षात घेतली तरी त्यांची जलविषयक दृष्टी कळून येते. वहिवाट घालावी व एकंदर सर्व नदी, नाले व तलावातील साचलेला गाळ पुर्वीप्रमाणे शेतकऱ्यास फुकट नेऊ द्यावा. असे शेतकऱ्यांचा असूड मध्ये नमूद केले आहे.

सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून राज्यकर्त्यांची धोरणे असायला हवीत याचा प्रत्यय राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात राबवलेल्या उपक्रमातून येतो. निसर्गाकडून मिळालेल्या पाण्याचा मोठ्या कल्पकतेने वापर करून भौतिक प्रगती साधली. सतत पडणाऱ्या दुष्काळाशी यशस्वीपणे सामना करता यावा म्हणून त्यांनी जलसिंचन धोरण जाहीर केले. शेतीच्या पाण्यासाठी शास्त्रशुद्ध विचारांचे कार्य त्यांनी केले. पावसाळ्यात वाहून जाणारी पाण्यासारखी नैसर्गिक साधनसंपत्ती जतन करण्यासाठी, त्याआधारे उत्कर्ष साधण्यासाठी परिश्रम घेतले. ज्यामध्ये त्यांनी लोककल्याणाच्या तळमळीतून १९०९ साली राधानगरी च्या धरणप्रकल्पाचा प्रारंभ केला. पाणी आडवा पाणी जिरवा याचे महत्त्व ओळखून कोल्हापूरी पद्धतीचे बंधारे विकसित केले. पुढे याचा आदर्श नमुना म्हणून वापर केला. यामधून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. परंपरेने पडणाऱ्या दुष्काळावर मात करण्यासाठी अर्थात हरित क्रांतीची दिशा, आदर्श दाखवून देणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांच्या जलनीतीच्या धोरणास सद्यस्थितीत कृतीशील जोड हवी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जलधोरणासंबंधी मांडलेली भूमिका देखील महत्त्वाची आहे. सध्याच्या राष्ट्रीय नद्या जोड प्रकल्पाची कल्पना त्यांनी १९४२ ते १९४५ च्या दरम्यान मांडली. पाण्यासंबंधी आंतरराज्य समस्या उद्‌भवू नयेत यासाठी घटनेत तरतूदी करून ठेवल्या. पुराच्या पाण्याचा विनियोग करा हे १९४५ मध्ये कटक येथील परिषदेत सांगीतले. धरणे बांधून पाणी समुद्राला न जाऊ देता आडवावे हा विचार मांडला. एकूण देशाची जलनीती दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुड धरण, सोननदी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. याचेही स्मरण ठेवून जलनियोजन करणे गरजेचे वाटते.

निसर्गाने पावसाबरोबर पुरही दिला. त्या पुरात सरकारची धोरणे वाहून जाऊ नयेत, पाण्याची वाढलेली उपलब्धता हा एक विचार व्हायला हवा. दीर्घकालीन नियोजनाचा विचार करण्याची नितांत गरज आहे. नियोजनाचा दूष्काळ होऊ नये, महापुरूषांनी सांगीतलेल्या कृतीशील जलनीतीला जीवंत ठेवत यापुढल काळात जलनियोजन घडून यायला हवे.

**निष्कर्ष :**

पर्यावरण रक्षण, वनसंवर्धन, मृदा संवर्धन या प्रमाणे जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापन ही काळाची ग आहे. पाणी हा एक मौल्यवान नैसर्गिक घटक असून त्याचा सुयोग्य वापर करणे ही जाणीव महापुरूषांनी मह मानली होती. त्यांच्या दूरदृष्टीतून जलसंवर्धन व जलव्यवस्थापनाचा उत्कृष्ट व अचूक भाग पहावयास महापुरूषांचे जलनीती संबंधीचे विचार सुसंस्काराचा मार्ग दाखवितात. त्यासाठी त्यांच्या जलनीतीच्या आग्रही र करणे गरजेचे आहे. आज जरी जलनियोजनाची काही साधने दिसत असली तरी पाण्याचे दूर्भिक्ष जाणवत



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal* | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013) | Vol. 5, Issue 3
UGC Approved Journal July-August-Sept. 2018

अशा वेळी महापुरूषांनी दाखविलेल्या कृतीशील जलनीतीचा स्वीकार करावा लागतो तरच पाण्यासारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा समप्रमाणात, सार्वत्रिक असा अपेक्षित परिणाम दिसून येईल. महापुरूषांनी सांगीतलेल्या जलनितीला जिवंत ठेवत यापुढील काळात कालवे, चाऱ्या, बंधारे यासारख्या अनेक कार्यक्रमातून जलनियोजन घडून यायला हवे. नैसर्गिक स्त्रोतांबरोबर पारंपारिक स्त्रोतांनाही जपावे लागेल. असे केले तर निश्चितच क्रांतीकारी काम होणार आहे.

**संदर्भग्रंथ :**

१. प्रा. दिनेश कचकुरे, (लेख - पर्यावरण, जलसंवर्धनाचे पुरस्कर्ते छत्रपती शिवराय), दै. दिव्य मराठी २१/०२/२०१८ पृ.क्र. ७.

२. संपा. डॉ. दादा गोरे, प्रा. प्रभाकर मारोळकर, डॉ. गंगाधर पानतावणे, 'साहित्यलेणी', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, आवृत्ती जुलै १९९८, पृ.क्र. ५.

३. प्रा. सतीश कुमदाळे, 'पॅटर्न शिवरायांचा', आदित्य प्रकाशन लातूर, दुसरी आवृत्ती, १ जानेवारी २०१७, पृ.क्र. १११.

४. उत्तम कांबळे, 'महात्मा फुल्यांची जलनीती', सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, ८ मार्च २०१०, पृ.क्र. ८

५. तत्रैव, पृ.क्र. १०



Scanned with OKEN Scanner